# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०१/२०२३ (सोमवार) दुपार**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपींताविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. खापा :—** अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावर खापा पेठ शिवधाम कन्हान नदीचे पात्र येथे दिनांक १०/०१/२०२३ चे ००.१५ ते १५/०१/२०२३ चे ३.०० वा. पर्यंत यातील फिर्यादी नामे— कल्लु हसन कनोजे, वय ५६ वर्ष मंडळ अधिकारी खापा हे आपल्या स्टाफसह हे पोलीस स्टेशन खापा हद्दीत कन्हान नदी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना नमुद घटनावेळी व ठिकाणी संशयीत २७ आरोपी नामे अनुक्रमे— 1) अखिल लाड २) अर्जुन जांगडे ३) अर्जुन निळे ४) आशिष निळे ५) ईशांत बागडे ६) कुणाल येणुरकर ७) पिंटु सुरकार ८) बाल्या सुरकार ९) योगेश चरडे १०) शुभम हिंगे ११) गणेश जांगडे १२) मोनेश तिभोले १३) गोपाळ उईके १४) दादु खुबाळकर १५) अभि पराते १६) गणेश प्रजापती १७) सागर रोकडे १८) उमेश निमजे १९) संदीप गिरीपुंजे २०) असलम शहा २१) अक्षय लखपती २२) स्वप्नील सुरजुसे २३) पंकज पैठणकर २४) अविनाश कोल्हे २५) गोलु लिखार २६) आदित्य घटे २७) रमेश बोन्द्रे या आरोपीतांनी शिवधाम खापा पेठ येथील कन्हान नदीचे पात्रातुन अवैधरित्या एकुण १३०९ ब्रास रेती असा एकुण किंमती अंदाजे ३४,०३,४००/— रुपयाचा मुद्देमाल कन्हान नदीच्या घाटातुन उत्खनन करुन चोरी करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून खापा पोलीसांनी पो.स्टे. खापा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १२९७ बोरकर पोस्टे खापा मो. नं. ९८२३५८१२९७ करीत आहे.

## घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील आय यु डी पी काटोल येथे दिनांक १३/०१/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक १५/०१/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अनिसा अतिउल्ला खॉ, वय ३६ वर्ष, रा. होळी मैदान काटोल यांनी नगदी ८०००/— रू. नवीन बांधकाम सुरू असलेल्या घरी मजुरांना देण्यासाठी सुटकेसच्या आत ठेवलेले होते. फिर्यादी हि घरी गेली व नंतर बांधकाम पाहण्यास आली असता गेटचे कुलुप उघडुन आत आली व लाकडी दाराचे कुलुप उघडण्यास गेली असता कुलुप तुटलेले दिसले व आत जावुन पाहीले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व फिर्यादीने मजुरांना पैसे देण्याकरीता सुटकेसमध्ये ठेवलेले नगदी असा एकुण ८००० /— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८०, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर आगासे पोस्टे काटोल मो. नं ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील पंचवटी काटोल येथे दिनांक १४/०१/२०२३ चे २१.३० वा. ते दिनांक १५/०१/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर यामरावदेव दुंदे, वय ५५ वर्ष, रा. शिर्साWाडी ता. काटोल ह. मु. नबीरा ले आउट पंचवटी काटोल हे आपले पंचवटी येथील घरी गेले असता व घराचे छतावरील खोलीचे लाकडी दरवाज्याचे कुलुप उघडण्यास गेले असता लाकडी दरवाज्याचे कुलुप तुटलेला दिसला फिर्यादीने आतमधे जावुन पाहीले असता फिर्यादीचा अॅसुस कंपनीचा लॅपटॉप जुना किंमती अंदाजे १०,०००/– रूपये व जुना वापरता १६ जीबी सॅन्डीक्स कंपनीचा पेनड्राईव्ह किंमती अंदाजे २००/– रू. असा एकुण १०,२००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८०, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर आगासे पोस्टे काटोल मो. नं ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**